YashwantraoChavan Maharashtra Open University, Nashik
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan, Nashik-422 222
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - 422 222
Ph.- 0253-2231714-15, Fax- 2231716, E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

जावक क्र. डीएसएम/मे-2017/२८-

दिनांक -27.04.2017

शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेकरिता सुचना

1) शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या सन 2015-2016 या तुकडीच्या विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली होती. परंतु UGC च्या F.No. 12-12/2016(DEB-III) Dated: OCT 2016 च्या पत्रानुसार ऑनलाईन परीक्षा घेता येत नसल्यामुळे या तुकडीच्या ऑनलाईन परीक्षेत जे विद्यार्थी अनुत्तीर्ण किंवा अनुपस्थित असतील अशा विद्यार्थ्यांनी मे – 2017 करिता ऑनलाईन परीक्षा अर्ज भरलेला असेल अशा विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा न घेता, सदरील परीक्षा ही **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी स्वरूपात** विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे व विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षाकेंद्रावर घेण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

2) य.च.म.मु.विद्यापीठाचे शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र सन 2016 पूर्वी च्या तुकडीकरिता कार्यरत होती. यातील काही अभ्यासकेंद्रांकडे NCTE ने नियमित डी. एड. / बी. एड. कॉलेज ची मान्यता नाकारल्याने व डी. एड. / बी. एड. शिक्षणक्रमासाठी प्रवेशासाठी पुरेसे विद्यार्थी उपलब्ध न झाल्याने अशी महाविद्यालये बंद झाली आहे. अशा महाविद्यालयाने या वरील कारणास्तव मुक्त विद्यापीठाची शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचीही अभ्यासकेंद्रे बंद केली . शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागीही झाली नाहीत. बंद झालेल्या अभ्यासकेंद्रावरील ज्या विद्यार्थ्यांनी शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे अंतर्गत कार्य पूर्ण केले आहे, परंतु फक्त मौखिक परीक्षा अद्याप दिलेली नाही. अशा विद्यार्थ्यांनी परीक्षेचा ऑनलाईन अर्ज सादर केलेला असेल तरच अशा विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा ही शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – 422 222 येथे घेण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांनी संपर्कांकरिता आपला अर्ज दिनांक 14 मे 2017 पर्यंत वरील पत्त्यावर पाठवावा किंवा sssoune@gmail.com या मेलवर अर्ज करावा. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याबाबतची नोंद घ्यावी.

समन्वयक,
शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम,

संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

प्रत – माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी
1) मा. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग
2) मा.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
3) मा.विभागीय संचालक – आपणास विनंती करण्यात येते की, सदरचे सूचनापत्र संबंधित अभ्यासकेंद्राच्या निदर्शनास आणून द्यावे.